जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८५० दिनांक - ०७/१२/२०२३**

सायबर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## इझी-पे प्रा.लिमी.येरवडा,पुणे या कंपनीची ३.५ कोटी रुपयेची फसवणूक करणा-या अटक एजंटाचे अन्य दोन साथीदारास परराज्यातून केले जेरबंद

इझी-पे प्रा.लिमी.येरवडा,पुणे ही कंपनी भारतभर ऑनलाईन पेमेंटची सुविधा जनतेस पुरविण्याचे काम करते. सदर कामाकरीता नमुद कंपनीचे भारतभर नोंदणीकृत एजंटची नेमणूक केलेली असुन,त्यांच्या माध्यमातून कंपनीचे कामकाज चालते. दिनांक ११/०८/२०२२ रोजीपासून नमुद कंपनीतील नोंदणीकृत असलेल्या एजंटांपैकी ६५ एजंट यांनी संगनमत करून कंपनीच्या वेबपोर्टल ॲपव्दारे कंपनीच्या अधिकृत यंत्रणेत कंपनीची फसवणूक करण्याच्या उद्देशाने अधिकृत केलेल्या मोबाईल व्यतिरिक्त दोन ते चार व त्यापेक्षा जास्त वेग-वेगळया मोबाईल संचांचा वापर करुन अनधिकृतपणे सदर मोबाईलव्दारे लॉग ईन आयडीने लॉग ईन करुन कंपनीच्या तांत्रिक सुविधांचा गैरवापर केला आहे. तसेच कंपनीचे व्हीपीए खात्यामधून अन्य ४४ बँक खात्यावर एजंटचे कमिशन व्यतिरिक्त ३,५२,७०,२१०.८२/- रुपयेची कंपनीची फसवणूक केली म्हणून दिले तक्रारीवरून **सायबर पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गु.र.नं.२०/२०२३ भा.दं.वि.कलम ४१९,४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ४३/६६,६६** डी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सायबर पोलीस स्टेशनकडून सदर गुन्हयातील आरोपी नामे अंकित कुमार अशोक पांडे,रा.ममरा,दुर्गापूर, बर्धमान,पश्चिम बंगाल व छोटू उर्फ एजाज आलम, वडील नामे जिआऊल अन्सारी,रा.गया,बिहार यांना यापुर्वी अटक करण्यात आली होती. सदर आरोपीतांचे विरोधात मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. नमुद अटक आरोपीतांकडून पाहिजे आरोपीतांची प्राप्त माहिती व तपासात प्राप्त इतर माहितीचे तांत्रिक विश्लेषण करुन गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे उबेद ऊर्फ उब्बेदुल्ला अन्सारी व आयुब आलम यांचा शोध घेणेकामी सायबर पोलीस स्टेशन कडील पोलीस उप-निरीक्षक,तुषार भोसले, पोलीस अंमलदार,राजकुमार जाबा, नवनाथ जाधव, निलेश लांडगे असे पोलीस पथक दिल्ली येथे रवाना झाले. सदर आरोपी हे त्यांचे राहण्याचे ठिकाण वारंवार बदलत होते. नमुद गुन्हयाच्या तांत्रिक तपासावरून आरोपी हे दिल्ली येथून बिहार येथे व त्यानंतर पश्चिम बंगाल येथे गेल्याचे समजले. तपासकामी गेलेले पोलीस पथक हे आरोपीतांचा माग काढत दिल्ली येथून बिहार तसेच पश्चिम बंगाल येथे जावून सापळा रचून **आरोपी नामे उबेद ऊर्फ उब्बेदुल्ला अन्सारी,वय-३६ वर्षे,रा.नांदोरा,पो.स्टे.आमस,गया,बिहार व आयुब बशिर आलम,रा.रिगनिया गाव,पोस्ट झारी,आमस,गया,बिहार यांना ताब्यात घेतले.**

त्यांचेकडे अधिक तपास करता त्यांचा गुन्हयातील सक्रिय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना एंटाली पोलीस स्टेशन,कोलकत्ता,पश्चिम बंगाल येथे आणून,सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीतांस मा. न्यायालयात हजर करुन,त्यांचा पाच दिवसांचा ट्रान्झीट रिमांड घेवून सायबर पोलीस स्टेशन,पुणे शहर येथे आणण्यात आले. नमुद आरोपीतांना मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट क्र.०६.शिवाजीनगर,पुणे यांचे समक्ष रिमांड कामी हजर केले असता,त्यांना ०५ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजूर केला आहे. नमुद आरोपीतांकडून ०४ मोबाईल संच व इतर साहित्य जप्त करण्यात आले असून,सदर गुन्हयाचा पुढील तपास करीत आहोत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,(अतिरिक्त कार्यभार) व मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,आर्थिक व सायबर,गुन्हे,श्री.विक्रांत देशमुख,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,आर्थिक व सायबर,गुन्हे,श्री.आर.एन.राजे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती.मिनल सुपे-पाटील,पोलीस उप-निरीक्षक,तुषार भोसले,पोलीस अंमलदार,संदेश कर्णे, राजकुमार जाबा,नवनाथ जाधव,शाहरूख शेख,निलेश लांडगे,नितीन चांदणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.